**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०३/२०१७**
**सरकार तर्फे वनपरिक्षेत्र कोठारी विरुध्द**
**अशोक लक्ष्मण फलके**
निशाणी क्र. १५

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ याची दोषारोपापूर्वीची शपथेवर साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करते की,
माझे नाव - माणिक नारायण गोंगले,
वय - ६६ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त,
राहणार – कुंदन प्लाझा हॉटेलच्या मागे, वृंदावन नगर, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.

**सरतपास अभियोग पक्षाकरिता सहा.सरकारी अभियोक्ता कु. माधुरी जोगे यांच्यामार्फत -**

१. आरोपीस मी ओळखतो. दिनांक १९.१२.२०१५ रोजी मी घोसरी वनपरिक्षेत्रात कार्यरत होतो. त्यादिवशी आम्ही कक्ष क्र. ५४४ मध्ये गस्त घालत असताना पहाटे ३.०० वाजेच्या सुमारास रेतीने भरलेला ट्रॅक्टर मिळाला. ती गाडी आम्ही जप्त करुन वन गुन्हा नोंदविला. त्यानंतर रेतीने भरलेला ट्रॅक्टर रेंज कार्यालयात जमा केले. जिथे ट्रॅक्टर मिळून आले तिथे आम्ही मौका पंचनामा केला. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी, श्री. मुलमुले यांची व पंचांच्या सह्या आहेत. तो **नि.क्र. १२** वर आहे.

२. त्यानंतर आम्ही तिथे रेती भरलेल्या ट्रॅक्टरचा जप्ती पंचनामा केला. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी, श्री. मुलमुले यांची व पंचांच्या सह्या आहेत. तो **नि.क्र. १३** वर आहे. त्यानंतर श्री. मुलमुले यांनी वन अपराध नोंदविला. त्याचा तपास मी केला. तपासादरम्यान मी साक्षीदारांची बयाने नोंदविली. त्या दरम्यान आम्ही किती पंचनामे केले होते हे मला आठवत नाही. आरोपीस मी अटक करुन त्याचा अटक फॉर्म भरला. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र. १६ देण्यात येतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास राखून ठेवला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Sameer Dilip Kamalakar

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2025.01.23 17:04:14 +0530

(स.दि.कमलाकर)

दिनांक - २३.०१.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा.